सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 328 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 25 / 08 / 2025

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**धर्माबाद :–** **दिनांक** 24.08.2025 चे 00.35 वा. चे सुमारास, **पानसरे शाळेसमारे रोडवर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. शेख रऊफ शेख अब्दुल, 2. शेख हुसैन शेख वाहेदसाब, दोघे रा. बाळापूर ता. धर्माबाद यांनी संगणमत करून फिर्यादीस तुम्हारे वजे से मेरा प्लॉट हाथ से जा रहा है और मेरा बिस लाख का नुकसान हो रहा है असे म्हणून प्लॉटचे मालकी हक्काचे कारणावरून फिर्यादीचे डोक्यात विटने मारहाण केली. व आरोपीचे ताब्यातील क्रमांक एचआर / 50 डी–4240 कार मधून पेट्रोल घेवून येवून फिर्यादीचे अंगावर टाकून माचीस पेटवत असताना फिर्यादी झटापट करून पळून गेले. नमुद आरोपीतांनी खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी शेख पॉशामियॉ शेख गौस वय 57 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. फुलेनगर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 264 / 2025 कलम 109,126(2),118(1),115(2),352,3(5), बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / पगलवाड, मो. नं. 8605782588** हे करीत आहेत.

## 2)फसवणुक :–

**कंधार :–** दिनांक 22.08.2025 रोजी 11.00 वा. चे सुमारास, **मौ. मादाळी ता.कंधार जि.नांदेड येथे,** यातील दोन अनोळखी महिला यांनी यातील फिर्यादीचे सासूस पितळी भांडे व सोन्याचे दागिने उजळून देतो असे म्हणून यातील फिर्यादी व त्यांचे सासु यांनी दागिणे व पितळी भांडे किंमत 58,000 / –रू उजळण्यासाठी विश्वासाने दिले असता घेवून जावून फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी अहमदाबी इसाम शेख, वय 52 वर्षे, व्यवसाय घरकाम रा मादाळी ता.कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 298 / 2025 कलम 318(4),3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1265 गिते, मो.नं.** 8007807771 हे करीत आहेत.

## 3)अवैध गुटखा बाळगला :–

**उस्माननगर :–** दिनांक 24.08.2025 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **नांदेड ते उस्माननगर जाणारे रोडवर तेलंगवाडी ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे जावेद मोहमद हुसेन शेख, वय 35 वर्षे, व्यवसाय ॲटो चालक रा. उस्माननगर ता. कंधार जि. नांदेड हा स्वतःचे आर्थीक लाभासाठी विना परवाना बेकायदेशिररित्या विवीध कंपणीचा गुटखा, पानमसाला, सुंगधीत तबांखु किंमती 17,800 / –रूपयाचा माल ॲटो क्रमांक एमएच–26 / एके 3840 किंमती 1,00,000 / – रूपयाची मध्ये चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि / गजानन विठ्ठलराव गाडेकर, ने. पोस्टे उस्माननगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 221 / 2025 कलम 123,223,274,275,3(5) भारतीय न्याय संहिता– 2023 कायदा सह कलम 26(2),27,30(2),(अ),59 अन्न सुरक्षा मानदे कायदा 2006 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / मुंडे, मो.क्रं.** 9823148435 हे करीत आहेत.

## 4)भारतीय हत्यार कायदा :–

**1)विमानतळ :– मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी **स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत स्ट्रिट सेफ्टी पथक आणि शहरातील सर्व पोलीस स्टेशन यांना भारतीय हत्यार कायदा अन्वये कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते.** त्या अनुषंगाने दिनांक 23.08.2025 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **माला पेट्रोल पंपा जवळ रोडवर, नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. गणेश गोविंद थोरात, वय 28 वर्षे, रा. ब्राम्हणवाडा, नांदेड 2. हानुमान रामजी जलालपूरे, वय 29 वर्षे, रा. त्रिकुट नांदेड हे विना परवाना बेकायदेशिररित्या एक लोखंडी खंजर किंमत 1000 / –रू ताब्यात बाळगून एक स्प्लेंडर मोटार सायकल किंमती 50,000 / –रू सह मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ / 214 हणमंत माधवराव पाकलवाड, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 323 / 2025 कलम 4 / 25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना / 344 राणे, मो.क्रं.** 9970391886 हे करीत आहेत.

**2)अर्धापूर :–** दिनांक 24.08.2025 रोजी 20.50 वा. चे सुमारास, **महादेव पिंपळगाव फाटा येथे,** यातील आरोपी नामे इश्वर मारोती जागणे, वय 18 वर्षे, रा. समता नगर नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या एक लोखंडी तलवार ताब्यात बाळगून एक स्प्लेंडर मोटार सायकल किंमती 40,000/–रू व एक ॲपल कंपनीचा मोबाईल फोन किंमती 30,000/–रू सह मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/615 विजय रामराव कदम, ने. पोस्टे अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 496/2025 कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2215 पाटील, मो.क्रं.** 9322857773 हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबिशन :–

**हिमायतनगर :–** दिनांक 24.08.2025 रोजी 18.20 वा. सुमारास, **हिमायतनगर ते किनवट जाणारे रोडवर नायरा पेट्रोल पंपाजवळ,** यातील आरोपी नामे 1. राहूल विजयकुमार नरवाडे, वय 35 वर्षे, 2. बालाजी किशन जाधव, वय 28 वर्षे, दोघे रा. हिमायतनगर हे विना परवाना बेकायदेशिररीत्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमत 3840/–रू चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेले मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/चंद्रकांत गोविंदराव आर्किलवार, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 195/2025 कलम 65(ई) म.प्रो.का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2401 जाधव,** मो.नं. 9665588543 हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड